पुढारी

# श्री रवळनाथ सोसायटी कुडाळच्यावतीने विविध क्षेत्रांतील व्यक्तींचा गौरव

**कुडाळ : पुढारी वृत्तसेवा**

सामाजिक बांधिलकी जोपासून श्री रवळनाथने केलेला आमचा सन्मान सर्वांना प्रेरणा देणारा आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक प्रवीण बांदेकर यांनी केले. श्री रवळनाथ को-ऑप हौसिंग फायनान्स सोसायटी, शाखा कुडाळच्या वतीने विविध क्षेत्रात यश संपादन केलेले साहित्यिक, शिक्षक व मुलांचा गौरव संस्थेच्या कार्यालयात करण्यात आला.



**कुडाळ : श्री रवळनाथच्या वतीने ज्येष्ठ साहित्यिक प्रवीण बांदेकर यांचा सत्कार करताना डॉ. राणे, श्री. मायदेव, अशोक येजरे, डॉ. पाटील व संचालक.**

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे हृदयरोगतज्ज्ञ डॉ. जी. टी. राणे उपस्थितीत होते. व्यासपीठावर ज्येष्ठ साहित्यिक प्रवीण बांदेकर, श्री रवळनाथचे उपाध्यक्ष व्ही. के. मायदेव, संचालक डॉ. दत्ता पाटील, कुडाळ शाखा चेअरमन अशोक येजरे, संचालक मनोहर गुरबे, अजय चव्हाण, सानिका मदने, रूपाली शिरसाठ, शाखाधिकारी विक्रम जांभेकर, कर्मचारी, सत्कारमूर्ती उपस्थित होते

साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त प्रवीण बांदेकर, आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त विजय धामापूरकर, सेवानिवृत्तपर सत्कारमध्ये सरबळ इंग्लिश स्कूल मुख्याध्यापक विवेकानंद बालम, डॉ. एस. एस. कुडाळकर हायस्कूल मुख्याध्यापक पुंडलिक घाडीगावकर, आंबोली सैनिक स्कूल प्राचार्य सुरेश गावडे, वासुदेवानंद सरस्वती विद्यालय माणगावच्या शिक्षिका अपूर्वा चव्हाण, वालावल शाळेच्या उच्चश्रेणी मुख्याध्यापिका अनघा येजरे, नेरूर- गोवेरी शाळेचे पदवीधर शिक्षक प्रवीण वेटे, शाळा पाटसावरीच्या शिक्षिका विनया पाटील, जलतरणपटू शमिका चिपकर, शष्यवृत्ती परीक्षेत जिल्हा प्रथम कैवल्य मिशाळ, एमबीबीएस परीक्षेत गोल्ड मेडलिस्ट डॉ. मोहम्मद आवटे, भारतीय सैन्यदलात लेफ्टनंटपदी निवड झालेली बाव गावची सुकन्या दीपाली गावकर आदी विविध मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

प्रास्ताविक डॉ. दत्ता पाटील यांनी, तर सूत्रसंचालन सानिका मदने यांनी केले.